**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./४५३९/२०२४ दिनांक :- २८/०६/२०२४

**प्रसिद्धीपत्रक**

**दिनांक ३०/०६/२०२४** रोजी, **संत श्री.तुकाराम महाराज** व **संत श्री. ज्ञानेश्वर महाराज** यांच्या पालख्या पुणे शहरात एकत्रित येत असून, दोन्ही पालख्यांचा पुणे शहरातील आगमनामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पालखी मार्ग व परिसरातील वाहतूक **आवश्यकतेनुसार** तात्पुरत्या स्वरुपात खालील बदल करीत आहे.

**(अ) संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज पालखी आगमन मार्ग, वाहतूकीसाठी बंद रस्ते व पर्यायी मार्ग –**

(१) **संत श्री. तुकाराम महाराज पालखी मार्ग** :- दि. ३०/०६/२०२४ रोजी विठ्ठल मंदिर आकुर्डी येथुन निघुन चिंचवड, पिंपरी, वल्लभनगर नाशिक फाटा, फुगेवाडी, दापोडी, **हॅरीस ब्रिज, बोपोडी चौक, खडकी रेल्वे स्टेशन, मरिआई गेट चौक, वाकडेवाडी पाटील इस्टेट चौक, इंजिनिअरींग कॉलेज चौक**

➢ संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांची पालखी दिनांक ३०/०६/२०२४ रोजी आकुर्डी येथून येणार असल्याने खालील नमूद रस्ते पहाटे ०२.०० वा. पासून आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गांवर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा

**संत तुकाराम महाराज पालखी बोपोडी चौकात पोहोचेपर्यंत**
**बोपोडी चौक ते चर्च चौक,**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी सुरु रस्ते |
|---|---|---|
| १ | बोपोडी चौक ते खडकी बाजार | अंतर्गत रस्त्याने चर्च चौक |
| २ | चर्च चौक | भाऊ पाटील रोड - ब्रेमेन चौक - औंध मार्गे |
| ३ | पोल्ट्री फार्म चौक | रेल्वे पोलीस मुख्यालया समोरून औंध रोड - ब्रेमेन चौक |
| ४ | मुळा रोड ते कमल नयन बजाज उद्यान चौक | अंतर्गत रस्त्याचा वापर करावा |

**संत तुकाराम महाराज पालखी इंजिनियरींग कॉलेज चौक पोहोचे पर्यंत**
**चर्च चौक ते इंजिनियरींग कॉलेज चौक,**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी सुरु रस्ते |
|---|---|---|
| १. | जुना मुंबई-पुणे मार्गावरून पुण्याकडे येणारी सर्व प्रकारची वाहने बंद करण्यात येतील. | १. बोपोडी चौकातून पुणे/मुंबईकडे जाणारे वाहनांनी भाऊ पाटील रोडवरून औंध रोड मार्गे ब्रेमेन चौकातून इच्छितस्थळी जावे. |

| | | |
|---|---|---|
| २. | आर.टी.ओ. ते इंजिनिअरींग कॉलेज चौक | १. आर.टी.ओ. चौक -शाहीर अमर शेख चौक -कुंभार वेस चौक<br>२. आर.टी.ओ चौक -जहांगीर चौक - आंबेडकर सेतू ते गुंजन मार्गे |
| ३. | सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट चौक | पर्णकुटी चौक - बंडगार्डन ब्रीज - महात्मा गांधी चौक मार्गे |

**(ब) संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमन मार्ग, वाहतूकीसाठी बंद रस्ते व पर्यायी मार्ग –**

(१) दि. ३०/०६/२०२४ रोजी श्री. क्षेत्र आळंदी येथुन निघुन वडमुखवाडी, चऱ्होली फाटा, दिघी मॅगझीन, बोपखेल फाटा, बी.ई.जी. ट्रेनिंग बटालीयन नं. २, म्हस्के वस्ती कळस ओढा, विश्रांतवाडी, फुलेनगर, साप्रस चौकी, चंद्रमा चौक, डावीकडे वळून सादलबाबा चौक, उजवीकडे वळून संगमवाडी रोडने पाटील ईस्टेट चौक, डावीकडे वळून इंजिनीअरींग कॉलेज चौक

- **संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी दिनांक ३०/०६/२०२४ रोजी आळंदी येथून येणार असल्याने खालील नमूद रस्ते पहाटे ०२.०० वा. पासून आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गांवर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी सुरु रस्ते |
|---|---|---|
| १. | कळस फाटा ते बोपखेल फाटा / विश्रांतवाडी चौक | धानोरी रोडने व अंतर्गत रोडने |
| २. | मेंटल हॉस्पीटल कॉर्नर ते आळंदी रोड जंक्शन | जेल रोड -विमानतळ रोड मार्गे |
| ३. | सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट रोड | पर्णकुटी चौक - गुंजन चौक - जेल रोड - गॅरीसन इंजिनिअरींग चौक- विश्रांतवाडी चौक |
| ४. | चंद्रमा चौक ते आळंदी रोड | अंतर्गत रस्त्यांचा वापर करावा. |
| ५. | नविन आंबेडकर सेतू ते चंद्रमा चौक बंद | |
| ६. | होळकर ब्रीज ते चंद्रमा चौक व<br>होळकर ब्रीज ते साप्रस चौकी बंद | |

**टिप :- सदर कालावधीमध्ये फक्त आळंदीकडे जाणारे रस्ते बंद राहणार असून इतर रस्ते वाहतूकीकरीता सुरू राहतील**

**(क) संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालख्यांचे एकत्रित मार्ग -**

पुणे-मुंबई रोडने इंजिनियरींग कॉलेज चौक, संचेती चौक, सिमला ऑफीस चौक, वीर चाफेकर चौक, ज्ञानेश्वर पादुका चौक, तुकाराम पादुका चौक, गुडलक चौक, खंडोजीबाबा चौक, टिळक चौक, लक्ष्मी रोडने विजय टॉकीज चौक, सेवासदन चौक, बेलबाग चौक, बुधवार चौक, पासोडया विठोबा मंदीर, मोती चौक, सोन्या मारुती चौक, हमजेखान चौक, डुल्या मारुती चौक, नानापेठ पोलीस चौकी चौक येथे आलेनंतर संत तुकाराम महाराजांची पालखी अरुणा चौक मार्गे निवडुंगा विठोबा मंदीर येथे जावून मुक्काम करेल तसेच .संत श्री.ज्ञानेश्वर महाराजांची पालखी अशोक चौक मार्गे पालखी विठोबा मंदीर येथे जावून मुक्काम करेल.

❖ संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या दिनांक ३०/०६/२०२४ रोजी अनुक्रमे निवडुंग्या विठोबा मंदीर, नाना पेठ व पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, पुणे येथे मुक्कामास येणार असल्याने खालील नमूद रस्ते दुपारी १२.०० पासून आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गावर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा

➢ *(अ)* इंजिनियरींग कॉलेज चौक ते तुकाराम पादुका चौक

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी सुरु रस्ते |
|---|---|---|
| १. | रेंजहिल चौक ते संचेती चौक (गणेश खिंड रोड ) | १.रेंज हिल्स - खडकी पो.स्टे अंडरपास- पोल्ट्री चौक - जुना मुंबई - पुणे महामार्ग<br>२.रेंज हिल्स - सेनापती बापट रोड - नळ स्टॉप चौक |
| २. | खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक (फर्ग्युसन रोड) | खंडोजीबाबा चौक - कर्वे रोड - सेनापती बापट रोड - रेंजहिल |
| ३. | गाडगीळ पुतळा ते स.गो बर्वे (शिवाजी रोड) | गाडगीळ पुतळा - कुंभारवेस चौक - आर.टी.ओ. चौक- जहांगीर मार्गे |
| ४. | वीर चाफेकर चौक ते वाकडेवाडी भुयारी मार्ग | पोल्ट्री फार्म चौक, रेंजहिल मार्गे किंवा औंध मार्गे |
| ५. | डेक्कन वाहतूक विभाग ते थोपटे पथ चौक (मॉडर्न कॉलेज रोड) | घोले रोड व आपटे रोड |
| ६. | कुंभार वेस चौक ते गाडगीळ पुतळा चौक आणि मालधक्का ते शाहीर अमर शेख चौक | १. कुंभारवेस- पवळे चौक - फडके हौद चौक<br>२. मालधक्का चौक -नरपतगीर चौक- पंधरा ऑगस्ट चौक - कमला नेहरू हॉस्पीटल |

➢ *(ब)* तुकाराम पादुका चौक ते बेलबाग चौक

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी सुरु रस्ते |
|---|---|---|
| १. | टिळक चौक ते विर चाफेकर चौक (फर्ग्युसन रोड) | शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल - नळ स्टॉप -सेनापती बापट रोड - रेंजहिल |
| २. | शनिवार वाडा ते स.गो बर्वे - संचेती चौक (शिवाजी रोड) | शनीवार वाडा- कुंभार वेस - मालधक्का चौक -पुणे स्टेशन - अलंकार चौक- जहांगीर चौक - आर.टी.ओ. चौक |
| ३. | कुंभार वेस चौक ते गाडगीळ पुतळा चौक | १. कुंभारवेस- पवळे चौक - फडके हौद चौक |
| ४. | शास्त्री रोड सेनादत्त चौकाजवळ बंद शेलारमामा चौक ते खंडोजीबाबा चौक | १. म्हात्रे पुलामार्गे<br>२. गरवारे कॉलेज मार्गे- एस.एम.जोशी पुल ते कर्वे रोड किंवा प्रभात रोड मार्गे<br>३. कर्वे रोड - रसशाळा चौक |
| ५. | टिळक रोड - पूरम चौक ते अलका टॉकीज चौक | विश्व हॉटेल- ना.सि. फडके चौक -नाथ पै चौक - शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल- नळ स्टॉप चौक |

| | | |
|---|---|---|
| ६. | **लक्ष्मी रोड - बेलबाग चौक ते टिळक चौक** | बेलबाग चौक, शिवाजी रोड ते गोटीराम भैय्या चौक - राष्ट्रभुषण चौक- हिराबाग चौक - विश्व हॉटेल -ना.सि. फडके चौक नाथ पै चौक - शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल-नळ स्टॉप |
| ७. | **शिवाजी रोड - जिजामाता चौक ते बुधवार चौक - बेलबाग चौक** | १. फुटका बुरूज – गाडगीळ पुतळा / नदीपात्रातील रस्ता<br>२. जिजामाता चौक - फडके हौद चौक |
| ८. | **लक्ष्मी रोड - संत कबीर चौक - बेलबाग चौक** | संत कबीर चौक - रास्ता पेठ चौक / सेव्हन लव्ह्ज चौक |
| ९. | **शनीपार चौक ते सेवा सदन चौक** | शनीपार चौकातून उजवीकडे रामेश्वर चौक - गोटीराम भैय्या चौक- गोविंद हलवाई चौक / उजवीकडे नागनाथ पार चौक |
| १०. | **नेहरू चौक -सोन्या मारुती चौक** | नेहरू चौक - गोटीराम भैय्या चौक - रामेश्वर चौक |

➢ ***(क)* <u>बेलबाग चौक ते निवडुंगा विठोबा मंदीर</u>/पालखी विठोबा मंदीर**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | **वाहतूकीसाठी सुरु रस्ते** |
|---|---|---|
| १. | **लक्ष्मी रोड - बेलबाग चौक ते सेवासदन चौक** | बेलबाग चौक - रामेश्वर चौक - शनिपार चौक - बाजीराव रोडने इच्छितस्थळी |
| २. | **शिवाजी रोड - जिजामाता चौक ते बुधवार चौक - बेलबाग चौक** | १. फुटका बुरूज– गाडगीळ पुतळा-कुंभारवेस<br>२. फुटका बुरूज - नदीपात्रातील रस्ता<br>३. जिजामाता चौक - फडके हौद चौक |
| ३. | **लक्ष्मी रोड - संत कबीर चौक - बेलबाग चौक** | संत कबीर चौक - रास्ता पेठ चौक / सेव्हन लव्ह्ज चौक |
| ४. | **शनीपार चौक ते सेवा सदन चौक** | १. शनीपार चौकातून रामेश्वर चौक- गोविंद हलवाई चौक / नागनाथ पार चौक |
| ५. | **देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक** | गणेश रोड - फडके हौद चौक मार्गे |
| ६. | **सोमवार पेठ पोलीस चौकी ते डुल्या मारुती चौक** | गणेश रोड - फडके हौद चौक मार्गे |
| ७. | **रामोशी गेट ते पालखी विठोबा मंदीर<br>संत कबीर चौक ते चाचा हलवाई चौक** | नेहरू रोड |

**तसेच सालाबाद प्रमाणे चालू वर्षी संत श्रेष्ठांच्या पालख्या दिनांक ३०/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४ या कालावधीत पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये राहणार असल्याने यादरम्यान शहरात जड वाहने येऊन वाहतूक समस्या निर्माण होऊ नये म्हणून मुंबई, सोलापूर व अहमदनगर दिशेने येणारे सर्व प्रकारचे जड वाहनांचे वाहन चालकांनी खालील नमूद मार्गाचा वापर करुन होणारी संभाव्य गैरसोय टाळून पोलीसांना सहकार्य करावे.**

❖ दिनांक : ३०/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४ या कालावधीकरीता (आवश्यकतेनुसार)

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | सोलापूर कडून पुणे शहर / नगर / नाशिक / मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांना बंदी करण्यात येत आहे. | १) चौफुला- केडगांव – पारगाव- नाव्हरे फाटा - नगर रोड - शिक्रापूर – चाकण - तळेगांव<br>२) थेऊर फाटा - केसनंद - वाघोली/लोणीकंद - नगर रोड मार्गे इच्छितस्थळी |
| २. | लोणीकंद येथुन थेऊर फाटा (सोलापूर रोड) कडे येणाऱ्या वाहनांना बंदी करण्यात येत आहे. | लोणीकंद - शिक्रापूर - नाव्हरे मार्गे इच्छितस्थळी |
| ३. | सासवडकडुन मुंबई / नाशिक/ नगरकडे जाणारे व येणारे वाहनांना बंदी करण्यात येत आहे. | १) सासवड - नारायणपूर - कापूर होळ - कात्रज बायपास मार्गे<br>२) सासवड - बोपदेव घाट - कात्रज बायपास मार्गे |
| ४. | खराडी बायपास येथून मगरपट्टा रोडने सोलापूर रोडकडे येणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे. | खराडी बायपास - नगर रोडने शिक्रापूरमार्गे नाव्हरे किंवा शिरुर मार्गे |

❖ संत तुकाराम महाराजांची पालखी दि. ०३/०७/२०२४ रोजी लोणीकाळभोर येथुन प्रस्थान होऊन श्री. क्षेत्र पंढरपूरकडे जाणार असल्याने दि. ०२/०७/२०२४ रोजी २३.०० वा. ते दि. ०५/०७/२०२४ रोजी पालखी रोटी घाटात जाईपर्यंत वाहतूकी मध्ये बदल करण्यात येत आहे.

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | थेऊर फाटा येथुन सोलापूरकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे. | थेऊर फाट - केसनंद - वाघोली/लोणीकंद - नगर रोड - शिक्रापुर -नाव्हरे इच्छितस्थळी |
| २. | खडी मशिन चौक येथुन मंतरवाडी फाट्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे. | खडीमशिन चौक येथुन कात्रजकडे किंवा बोपदेव घाटमार्गे इच्छितस्थळी |

❖ **सोलापूरकडून पुणेकडे येणारी वाहतूक चौफुला येथुन दि. ०१/०७/२०२४ रोजी २१.०० वा. पासुन बंद करणेबाबत पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण व पोलीस अधिक्षक, महामार्ग सुरक्षा पथक यांना कळविले आहे.**

❖ सासवडकडुन दिवेघाटमार्गे पुणेकडे येणारी वाहतूक दि. ०१/०७/२०२४ रोजी २३.०० वा. पासुन बंद करणेबाबत पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांना कळविले आहे.

❖ दि. ३०/०६/२०२४ रोजी पालखी आगमन व दि. ०२/०७/२०२४ रोजी पालखी प्रस्थानावेळी संपुर्ण पालखी मार्गावर येणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येणार असुन जस-जशी पालखी पुढे जाईल त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार वाहतूक सुरु करण्यात येणार आहे.

➢ इतर निर्बंध

(१) पालख्यांच्या मार्गावरील वारकऱ्यांची व भाविकांची गैरसोय होवू नये या उद्देशाने व सुरक्षिततेच्या दृष्टीने या मार्गाचे दोन्ही बाजूस तसेच त्यास छेदणारे इतर उप-रस्त्यांवर आतील भागात १०० मी. पर्यंत सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास तात्पुरता प्रतिबंध करण्यात येत आहे.

२) पालख्यांचे आगमन व प्रस्थान मार्गावरील पालखी पुढे जाऊन मागील रस्ता जस-जसा वाहतूकीस योग्य होईल त्याप्रमाणे मागील रस्त्यावरील वाहतूक टप्या-टप्याने पुर्ववत करण्यात येईल.

३) दिनांक **३०/०६/२०२४** रोजी १२.०० वा. पासून दिनांक ०२/०७/२०२४ रोजी,पालखी प्रस्थान होई पर्यंत **संत श्री.तुकाराम महाराज** व **संत श्री.ज्ञानेश्वर महाराज** यांच्या पालख्या पुणे शहरात मुक्कामास येत आहेत. संत तुकाराम महाराज यांचे पालखीचा मुक्काम **निवडूंग्या विठोबा मंदीर** तसेच संत श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखीचा मुक्काम **पालखी विठोबा मंदीर** येथे आहे. त्यामुळे या मंदीरा समोरील अनुक्रमे **१.** अरूणा चौक ते पारशी अगेरी व **२.** पालखी विठोबा चौक ते बाबासाहेब किराड पथ जंक्शन या रस्त्यांवर **सर्व प्रकारच्या वाहनांना ये-जा करण्यास व पार्कींग करण्यास मनाई** करण्यात येत आहे तसेच या परिसरातील वाहतूक भाविकांच्या गर्दीनुसार आवश्यकतेप्रमाणे वळविण्यात येणार आहे.

➢ संत श्री.ज्ञानेश्वर महाराज व संत श्री.तुकाराम महाराज पालख्यांचा सोहळा पुणे शहरात सुरक्षित व्हावा व वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी सर्व नागरीकांनी वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून तसेच पोलीसांनी त्या-त्यावेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.

➢ **पालखीच्या दिंडयांसोबत येणाऱ्या वाहनांच्या पर्यायी मार्गाबाबत :-**

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या दिंडयांसोबत येणाऱ्या वाहनांनी खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा.

१) दिनांक ३०/०६/२०२४ रोजी आळंदी कडून विश्रांतवाडी पर्यंत येणाऱ्या वाहनांनी आळंदी - मरकळ - तुळापुर - फुलगांव - लोणीकंद - वाघोली - लोहगांव/ येरवडा या मार्गाचा वापर करावा.

२) दिनांक ३०/०६/२०२४ रोजी इंदीरानगर, दत्तमंदीर पासून मरिआई गेटकडे जाणाऱ्या वाहनांनी साप्रस चौकी जंक्शन - चंद्रमा चौक - सादलबाबा दर्गा - पर्णकुटी चौक या मार्गाचा वापर करावा.

३) दिनांक ०२/०७/२०२४ रोजी पुण्याकडून - सासवडकडे जाणाऱ्या वाहनांनी

- भैरोबानाला चौक - लुल्लानगर चौक - कोंढवा खडीमशीन चौक - बोपदेव घाट मार्गे सासवड **किंवा**
- मंतरवाडी फाटा - फुरसुंगी मार्गे ऊंड्री-पिसोळी - खडी मशीन चौक मार्गे बोपदेव घाटाकडून सासवड या मार्गाचा वापर करावा.

या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास वाहतूक मुख्य नियंत्रण कक्ष, दुरध्वनी क्रमांक **२६६८५००० / २६६८४०००** संपर्क साधवा.

( रोहिदास पवार )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**
**प्रत सविनय सादर**
१) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर
२) मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर